# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.09.2024** **वारःशुक्रवार**

---

1. भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात उल्लेखनीय परिवर्तन होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,
2. एसटी महामंडळाला नऊ वर्षांनंतर प्रथमच 16 कोटी रुपयांहून अधिक नफा,
3. राज्यभरात गौरी गणपतींना भावपूर्ण निरोप,
4. राज्यातील सर्व प्रमुख धरणांमधील पाणीसाठा 90 ते 95 टक्क्यांवर आणि
5. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते सीताराम येचुरी यांचं निधन.

**मोदी**

भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात उल्लेखनीय परिवर्तन होत असून यामुळं नागरिकांसाठी प्रवास सुलभ होत आहे, तसंच दळणवळणाला चालना मिळत आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल संध्याकाळी नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आयोजित नागरी विमान वाहतूकविषयक दुसऱ्या आशिया प्रशांत मंत्रिस्तरीय परिषदेला संबोधित करताना बोलत होते. सर्व सदस्य देशांनी दिल्ली घोषणापत्र स्वीकारल्याची घोषणा पंतप्रधानांनी केली. दिल्ली घोषणापत्र हा प्रदेशाच्या विमान वाहतूक क्षेत्राला नवीन उंचीवर नेण्यासाठी तयार केलेला एक दूरदर्शी आराखडा आहे. नागरी विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांची या मंत्रिस्तरीय परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यावेळी उपस्थित होते.

**एस टी नफा**

गेली अनेक वर्ष आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन अर्थात एसटी महामंडळानं गेल्या ऑगस्ट महिन्यात 16 कोटी रुपयांहून अधिक नफा मिळवला आहे. महामंडळाच्या 31 पैकी 20 विभागांनी हा नफा मिळवण्यात मोठा वाटा उचलला आहे. 9 वर्षांनी एसटी महामंडळ नफ्यात आल्यानं महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर माधव कुसेकर यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं अभिनंदन केलं असून भविष्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करून महामंडळ सातत्यानं फायद्यात येईल यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन केलं आहे. राज्य शासनानं 75 वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास आणि सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात 50 टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या. त्यामुळं एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. सध्या सरासरी 54 लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत.

**करार**

एमएमआरडीए अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात काल सामंजस्य करार झाला. मुंबई महानगर क्षेत्रः जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकास या निती आयोगाच्या अहवालाचं मुंबईत प्रकाशन झालं. त्यावेळी हा करार झाला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**लोकार्पण**

मुंबईत वरळी वांद्रे सी लिंकला मरीन ड्राईव्हकडून येणारा रस्ता जोडणाऱ्या किनारी मार्ग प्रकल्पातल्या टप्प्याचं लोकार्पण काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच मंत्री दीपक केसरकर आणि

मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. या सागरी किनारा मार्गामुळे मरीन ड्राईव्ह ते वांद्रे हा पाऊण तासाचा रस्ता केवळ 10 मिनिटात पार करता येईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**उपराष्ट्रपती**

ठाणे जिल्ह्यात कोपरी इथल्या शासकीय तांत्रिक विद्यालयात उभारलेल्या संविधान मंदिराचं लोकार्पण उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या दूरस्थ उपस्थितीत येत्या रविवारी होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय तसंच राज्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीनं हे मंदिर उभारण्यात आलं आहे.

**ऊस**

केंद्र सरकारनं ऊस नियंत्रण आदेश 1966 मध्ये काही बदल सुचवून त्यावर सर्व संबंधितांकडून सूचना आणि हरकती मागविल्या आहेत. तसंच या कायद्यातील प्रस्तावित बदलांनंतर साखर नियंत्रण आदेश 2024 असा नवा कायदा घोषित केला जाणार आहे. त्यावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष पी. एन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साखर आयुक्तालयात एक बैठक झाली. साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांच्यासह 40 सहकारी साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक यावेळी उपस्थित होते.

**विसर्जन**

राज्यभरात घरोघरी विराजमान झालेल्या गणपतीबाप्पांचं आणि माहेरवाशिणी गौरीचं काल भावपूर्ण वातावरणात आणि 'पुढच्या वर्षी लवकर या' असा आग्रह धरत विसर्जन करण्यात आलं. गणेश विसर्जनसाठी राज्यात सर्वत्र प्रशासनानं चोख व्यवस्था ठेवली होती. पुण्यात महापालिकेनं 15 क्षेत्रीय कार्यालयांतर्गत 42 बांधीव हौद आणि 265 ठिकाणी 568 लोखंडी टाक्यांमध्ये व्यवस्था केली आहे. नागरिकांनी नदी, तलाव अशा नैसर्गिक स्त्रोतांमध्ये मूर्तींचं विसर्जन करु नये, असं आवाहन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी केलं.

कोल्हापूर जिल्ह्यातही सर्व ठिकाणी पर्यावरणपूरक विसर्जनासाठी कृत्रिम कुंड, काईली यांची व्यवस्था जिल्हा प्रशासनानं केली होती. कोल्हापुरातील पंचगंगा नदी घाट, रंकाळा तलाव, ईराणी खण, कळंबा तलाव, कोटीतिर्थ तलाव, राजाराम तलाव, राजाराम बंधारा याठिकाणी गर्दी झाली होती. सकाळपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत शहरात एक हजार 520 मूर्तींचं पर्यावरणपूरक विसर्जन झालं.

पालघर जिल्ह्यातल्या वसई विरार शहरात महानगरपालिकेनं उभारलेल्या कृत्रिम तलावांना गणेशभक्तांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शहरात 7 हजार 508 गणेश मूर्तींचं विसर्जन झालं. त्यापैकी 4 हजार 981 म्हणजेच 66 टक्क्यांहून अधिक मूर्तींचं विसर्जन कृत्रिम तलावात झालं.

सांगलीकरांचा मानाचा सांगली संस्थानच्या श्री गणपतीची भव्य मिरवणूक काढून विसर्जन करण्यात आलं. सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात काल 5510 गणेशमूर्तींचं विसर्जन करण्यात आलं. पालिका प्रशासनानं सांगली, मिरजेच्या कृष्णा नदी घाटावर तसच विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंड सज्ज ठेवली होती.

रत्नागिरी जिल्ह्यात नदी, तळी, ओहळांसह समुद्रावरही भाविकांनी गणपती विसर्जनासाठी गर्दी केली होती. काही ठिकाणी मिरवणूकही काढण्यात आली. काल जिल्ह्यातल्या सुमारे एक लाख 15 हजार घरगुती, तर 17 सार्वजनिक गणपतींचं विसर्जन करण्यात आलं.

**धरणं-मुंबई**

राज्यातली प्रमुख धरणं सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातच 90 ते 95 टक्के भरली आहेत. पैठण इथल्या जायकवाडी धरणात सध्या 98 पूर्णांक 46 टक्के पाणीसाठा झाला आहे. सध्या धरणाचे अठरा दरवाजे अर्ध्या फुटानं उचलून गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यात येत आहे. सोलापुरात उजनी धरण 100 टक्के आणि साताऱ्यातलं कोयना धरण 99

टक्के भरलं आहे. पुणे आणि कोकणातली 97 टक्के धरणं पूर्ण भरली असून मुंबई तसंच ठाणे जिल्ह्यातली धरणंही 95 ते 100 टक्के, नागपूर विभागातली धरणं 85 टक्के भरली आहेत. अमरावतीतील ऊर्ध्व वर्धा धरण 95 टक्के तर यवतमाळमधील इसापूर धरण 98 टक्के भरलं आहे. गोसीखुर्द धरण केवळ 55 टक्के तर जळगावमधलं उर्ध्व तापी धरण 45 टक्के भरलं आहे. ऑक्टोबरपर्यंत उर्वरित धरणंही भरतील, असा अंदाज आहे. यामुळे शेतकऱ्यांना रबी हंगामात जास्त उत्पादनाची अपेक्षा आहे.

**इशारा-धाराशिव, बीड**

लातूर-धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरील निम्न तेरणा आणि बीड जिल्ह्यातील मांजरा धरणांच्या निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक पाणी भरल्यास नद्यांमध्ये विसर्ग करण्यात येण्याची शक्यता असल्यानं नदीकाठच्या लोकांनी सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनानं दिला आहे.

**करार-सोलापुर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील जैवविज्ञान संकुलानं जैवविज्ञानामधील संशोधन आणि प्रशिक्षणासाठी सीमा बायोटेक, कोल्हापूर आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या सोलापूर केंद्रासोबत सामंजस्य करार केला आहे. बांबू तसंच तृणधान्य संशोधनातील नवीन तंत्रज्ञानाबाबत विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची संधी यामुळं मिळणार आहे.

**निधन**

हिंगोली जिल्ह्यातले मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातले ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक पुरबाजी हेंद्रे यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. आखाडा बाळापूर इथं त्याच्यावर आज अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**येचुरी निधन**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचं दिल्लीतल एम्स रुग्णालयात निधन झालं. ते 72 वर्षांचे होते. श्वसनमार्गाच्या तीव्र संसर्गानं ते ग्रस्त होते असं पक्षाद्वारे जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. येचुरी यांनी देहदानाचा संकल्प केला होता. सीताराम येचुरी यांचा जन्म बारा ऑगस्ट 1952 रोजी चेन्नई इथं तेलुगू भाषिक कुटुंबात झाला. ते कायमच विविध चळवळीत सक्रिय होते. आणीबाणीच्या काळात विद्यार्थी दशेत त्यांना अटक करण्यात आली होती. राष्ट्रपती, उप-राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी येचुरी यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. आपल्या निष्ठावंत आदर्शातून येचुरी यांनी सर्वच राजकीय पक्षांमध्ये मित्र जोडलेले होते असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. येचुरी हे डाव्या आघाडीचे एक दीपस्तंभ होते या शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तर येचुरी यांना देशाची सखोल समज होती असं लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**हवामान**

राज्यात आज बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.